जा.क्र. 673/81.1426
दि. 15/09/2022

23/प

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. (०२२) २२७९ ३८२६ सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
Website : maharashtra.gov.in मंत्रालय (विस्तार), कक्ष क्र. ६३१, मुंबई- ४०००३२.
Email : : lokshahidin.gad @ maharashtra.gov.in

क्रमांक: आरटीएस -२०२२/प्र.क्र.१४५/लो.दि.क. दिनांक:- १२ सप्टेंबर,२०२२

प्रति,

१) अ.मु.स./प्र.स./सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
२) विभागीय आयुक्त (सर्व)
३) जिल्हाधिकारी (सर्व)
४) महापालिका आयुक्त (सर्व)
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

विषय :- "राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा" आयोजित करणेबाबत
दि.१७ सप्टेंबर, २०२२ ते दि.२ ऑक्टोंबर, २०२२ पर्यंत.

सर्वसामान्य जनतेची कामे विहित कालावधीत व्हावीत याकरीता राज्य शासनाने सन २०१५ मध्ये **"आपले सरकार सेवा पोर्टल"** सुरु केले आहे. त्या माध्यमातून जनतेची कामे विहित कालमर्यादेत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तथापि, सदर पोर्टलचा आढावा घेतला असता व मंत्रालय स्तरावर नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे अवलोकन केले असता अनेक प्रकरणी संबंधित नागरिकांचे अर्ज/तक्रारी यांचा सक्षम प्राधिका-यांकडून विहित कालमर्यादेमध्ये निपटारा होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व प्रलंबित संदर्भ/अर्ज/तक्रारी यांचा निपटारा करणेकरिता **दि.१७ सप्टेंबर, २०२२ ते दि.२ ऑक्टोंबर, २०२२** या कालावधीत **"सेवा पंधरवडा"** राबविण्याचे शासनाने निश्चित केले आहे.

२. सेवा पंधरवडयात खालीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या व दि.१० सप्टेंबर २०२२ रोजी प्रलंबित असलेल्या सर्व अर्जांचा मोहिम स्वरुपात निपटारा करणे अपेक्षित आहे.

१. आपले सरकार वेबपोर्टल -३९२ सेवा
२. महावितरण पोर्टल -२४ सेवा
३. डी.बी.टी. पोर्टल- ४६ सेवा
४. नागरी सेवा केंद्रामार्फत देण्यात येणा-या शासकीय सेवा

५. विभागाच्या स्वत:च्या योजनांशी संबंधित पोर्टलवरील प्रलंबित अर्ज.

६. याव्यतिरिक्त सोबत जोडलेल्या सहपत्रातील १४ सेवा

३. सेवा पंधरवड्यामध्ये प्रामुख्याने सर्वसामान्य जनतेशी निगडीत असणाऱ्या महसूल विभाग, ग्रामविकास विभाग, नगरविकास विभाग, कृषि विभाग, आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, ऊर्जा विभाग तसेच सर्व शासकीय विभागांकडील महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाअंतर्गत अधिसूचित सेवा विषयी प्रलंबित कामांचा विहित कालमर्यादेमध्ये निपटारा करण्याकरीता कार्यपध्दती निश्चित करण्यात यावी व अंमलबजावणीकरिता सर्व संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन देण्यात यावी. सर्व संबंधित विभागांच्या जिल्हाप्रमुखांनी सेवा पंधरवडयाचे यशस्वी अंमलबजावणी करण्याकरिता नियोजन करावे व या संबंधातील प्रगतीविषयी क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून दैनंदिन आढावा घेण्यात यावा आणि क्षेत्रीय भेटी देण्यात याव्यात. शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या सेवा पंधरवडयाविषयी जनतेमध्ये यथोचित माहिती प्रसारीत करण्यात यावी. सेवा पंधरवडा कालावधीत मान्यवरांच्या भेटी, आयोजित शिबिरे, त्यामधील नागरिक-प्रशासनाचा सहभाग या विषयी स्थानिक प्रसार माध्यमांमधून प्रसिध्दी देण्यात यावी.

४. सेवा पंधरवडा समाप्तीनंतर दि.५ ऑक्टोबर २०२२ रोजी सर्व सक्षम प्राधिकारी यांचेकडून दि.१० सप्टेंबर २०२२ अखेर प्रलंबित संदर्भापैकी निपटारा करण्यात आलेले संदर्भ व निपटारा न झालेल्या संदर्भाविषयी स्वयंस्पष्ट कारणांसह प्रमाणपत्र घेण्यात यावे. प्रत्येक शासकीय विभागाने सेवा पंधरवडा कालावधीत केलेल्या कामकाजाविषयीचा प्रमाणपत्रासह जिल्हानिहाय प्रगती अहवाल सोबतच्या प्रपत्रामध्ये दि.१० ऑक्टोबर २०२२ पर्यंत शासनास सादर करावा.

५. राज्य शासनाच्या विविध विभागातील कार्यरत असणारे विविध पोर्टलवर माहिती वेळोवेळी अद्ययावत करणेची दक्षता घ्यावी.

६. उपरोक्त सेवा पंधरवडयाचे आयोजन करतांना ज्या भागात निवडणूक आचारसंहिता लागू असेल तेथे आचारसंहितेचे पालन करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

१४/९/२०२२

(मनु कुमार श्रीवास्तव)
शासनाचे मुख्य सचिव

सोबत- वरीलप्रमाणे

rs\vivek.patil\Desktop\Revised सेवा पंधरवडा.docx

..हपत्र

# सेवा पंधरवडा (१७ सप्टेंबर २०२२ ते २ ऑक्टोबर २०२२ )

## विभागनिहाय सेवांची यादी

| अ.क्र. | सेवा | विभाग |
|---|---|---|
| १ | अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नवीन शासन निर्णयानुसार मदत निधीचे वितरण | मदत आणि पुनर्वसन विभाग |
| २ | पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना - तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ देणे | कृषी/महसूल विभाग |
| ३ | प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा करणे | महसूल विभाग |
| ४ | पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण | अन्न व नागरी पुरवठा विभाग |
| ५ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | ग्राम विकास/नगर विकास /आरोग्य विभाग |
| ६ | मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे | ग्राम विकास विभाग/नगर विकास विभाग |
| ७ | नव्याने नळ जोडणी देणे | पा.पु.विभाग/नगर विकास विभाग |
| ८ | मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र देणे | ग्राम विकास विभाग/नगर विकास विभाग |
| ९ | प्रलंबित घरगुती विद्युत जोडणीस मंजुरी देणे | महावितरण |
| १० | मालमत्ता हस्तांतरणानंतर विद्युत जोडणीमध्ये नवीन मालमत्ताधारकाचे नाव नोंदविणे | महावितरण |
| ११ | बिरसा मुंडा कृषी क्रांती योजने अतंर्गत सिंचन विहिरी करिता अनूसुचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करणे | आदिवासी विकास विभाग/ ग्राम विकास विभाग |
| १२ | अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रलंबित वन हक्क पट्टे मजूर करणे. (अपिल वगळून) | आदिवासी विकास विभाग/ महसूल विभाग |
| १३ | दिव्यांग प्रमाणपत्र देणे | सामाजिक न्याय/आरोग्य विभाग |
| १४ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देणे | महसूल विभाग |